प्रत सर्व मंडळ व विद्युत मंडळातील सर्व विभागांना धाडावी

आवक नोंद

(४८अ)

उपसा सिंचन योजना कार्यान्वित करणे योजनांचे आराखडे तयार करणे इत्यादि विविध मंडळाची जबाबदारी.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-०६०९/(३११/०९)/मो.प्र.-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ जून २००९.

संदर्भ :- शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्र.संकिर्ण-१०९५/(२५०/९५)/मो.प्र.(प्र), दि.१६.१२.१९९५

**पूर्वपिठीका :**

मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या काही वर्षात मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातून तसेच कालव्यामधून शेतीला पाणीपुरवठा करुन सिंचन वाढविण्यासाठी बऱ्याचशा मोठ्या उपसा सिंचन योजनांना मान्यता देण्यात आलेली आहे. उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याची बाब बरीच किचकट असते. उपसा सिंचन योजनेंतर्गत पंपगृहे, मोठ्या व्यासाचे पाईप्स, मोठ्या अश्वशक्तीचे पंप्स, तसेच ट्रान्सफॉर्मर्स व कालव्याव्दारे शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी बांधकामे या सर्व उप घटकांचा प्रामुख्याने समावेश असतो. उपसा सिंचन योजनेचा असा अवघड असलेला आराखडा तयार करुन योजना कार्यान्वित करणे व पूर्णत्वास नेणे यामध्ये प्रामुख्याने स्थापत्य विभाग, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, विद्युत मंडळ, यांत्रिकी मंडळ, इत्यादिंचा सहभाग घ्यावा लागतो. या सर्व योजनांमध्ये सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने विविध मंडळाची जबाबदारी निश्चित करणे व आराखडयास मूर्त स्वरुप देण्याकरीता एक उपसमिती नेमण्याकरीता संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि सदर शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या उपसमिती मध्ये अध्यक्ष तसेच सदस्य सचिव म्हणून नामोल्लेख नसल्याने बैठका आयोजीत करण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या होत्या. ही बाब विचारात घेऊन शासन आता सदर संदर्भीय दिनांक १६.१२.१९९५ चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

२. वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी संकल्पचित्रे व विनिर्देश तयार करण्याचे काम करण्यासंदर्भात शासनाने आता खालील निर्णय घेतलेले आहेत.

१) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने उपसा सिंचन योजनांची उद्वाही पंपाची क्षमता, पंपाचे प्रकार, प्रत्येक पंपाची अश्वशक्ती इ. तपशिल संकल्पन करुन प्रस्तावित करावा. या तपशिलास यांत्रिकी यंत्रणेने अंतिम स्वरुप द्यावे. तसेच उद्वाही नलिकेचा व्यास, जाडी इ.गोष्टींना अंतिम स्वरुप देण्याबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने कार्यवाही करावी.

२) संबंधित यांत्रिकी मंडळ / विभाग यांनी पंपगृहाचा आराखडा तयार करावा.

३) योजनेचा सर्वसाधारण आराखडा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी तयार करावा.

४) संकल्पचित्रासाठी वापरावयाची क्षेत्रिय माहिती व तपशिल या विषयी दृढीकरण करण्याबाबत संबंधित यांत्रिकी मंडळ / विभागाने कार्यवाही करावी.

५) पंपगृहाच्या स्थापत्य कामाची सविस्तर संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने तयार करावीत.

६) उद्‌वाही नलिकांच्या विविध झडपांचे पंपगृहाच्या आतील झडपांबाबतच्या तपशिलास यांत्रिकी संघटनेने अंतिम स्वरुप द्यावे आणि पंपगृहाच्या बाहेरील झडपांबाबतच्या तपशिलास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने अंतिम स्वरुप द्यावे, तसेच जलाघात विश्लेषण व प्रतिजलाघात साधनांच्या बाबतीत (Surge analysis and anti surge devices) संबंधित यांत्रिकी मंडळाने / विभागाने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या सल्ल्याने कार्यवाही करावी.

३. उपसा सिंचन योजनांचा आराखडा त्वरीत तयार करणे व त्यास अंतिम स्वरुप देण्यासाठी एक उप समिती नेमण्याचाही शासनाने निर्णय घेतला आहे. या उप समितीत खालील अधिकारी राहतील.

१) अधीक्षक अभियंता, (विद्युत गृहे), संकल्पचित्र संघटना, नाशिक - अध्यक्ष

२) अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (व्दारे) - सदस्य

३) अधीक्षक अभियंता, (विद्युत) विद्युत मंडळ -- (प्रकल्पाशी संबंधीत) - सदस्य

४) अधीक्षक अभियंता (स्थापत्य) मंडळ, -- (प्रकल्पाशी संबंधीत) - सदस्य सचिव

४. पदसिध्द अध्यक्ष, अधिक्षक अभियंता (विद्युत गृहे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी बैठकी पुर्वी महासंचालक, मेरी यांचेशी सल्लामसलत व चर्चा करुन आपले मत मांडावे आणि अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (व्दारे) यांनी सूध्दा मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचेशी चर्चा करुन बैठकीत आपले मत मांडणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे अधिक्षक अभियंता, (विद्युत) विद्युत मंडळ यांनी सूध्दा मुख्य अभियंता (विद्युत) यांचेशी चर्चा करुन बैठकीत आपले मत मांडावे.

विद्युत

५. उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता मिळताच या उप समितीने प्राथमिक बैठक घेऊन योजनेच्या आराखडयास अंतिम स्वरुप देण्यासाठी संबंधित महामंडळाच्या स्थायी समितीची अंतिम मान्यता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( र. श्री. कळसकर )
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१. महासंचालक, मेरी, नाशिक.
२. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
३. मुख्य अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक,
४. मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक,
५. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, उपसा, पुणे,
६. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, (व्दारे) पुणे,
७. अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक,
८. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
९. मा.प्र.-१, निवडधारिका, / जलसंपदा विभागातील सर्व तांत्रिक अधिकारी व तांत्रिक कार्यासने.